# स्त्रीवादी लेखन करणाऱ्या लेखिकांची अभिव्यक्ती व सामाजिकता

**विनिता रावसाहेब भुजंग**

संशोधक विद्यार्थिनी, संशोधन केंद्र: मॉर्डन कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे.

DOI: https://doi.org/10.5281/zenodo.17260188

## ABSTRACT:

हा शोधनिबंध मराठीतील स्त्रीवादी लेखिकांची अभिव्यक्ती आणि सामाजिकता यांचा मागोवा घेतो. स्त्रीकेंद्री अनुभवविश्व, लैंगिक जाणिवा आणि पितृसत्तेतील दडपशाहीवर केंद्रित असलेले हे लेखन स्त्रीला समान हक्क व सामाजिक न्याय मिळवून देण्याच्या दिशेने कार्यरत आहे. लेखिका समाजातील रूढी व दुहेरी मानके उघड करून स्त्री-पुरुष संबंधांचे वास्तव मांडतात. स्त्रीवाद केवळ विचारप्रणाली नसून तो समाजपरिवर्तनाचा राजकीय प्रयत्न आहे.

एकोणिसाव्या शतकातील रमाबाई रानडे (आमच्या आयुष्यातील आठवणी) आणि ताराबाई शिंदे (स्त्री-पुरुष तुलना) यांच्या लेखनापासून ते साठोत्तरी कालखंडातील कवयित्रींच्या (अनुराधा पाटील, नीरजा) लेखनापर्यंतचा आढावा घेतला आहे. याशिवाय, हरिभाऊ आपटे आणि वा. म. जोशी यांच्या कादंबऱ्यांतील तसेच गडकरींसारख्या नाटककारांच्या साहित्यातील स्त्री-सुधारणेच्या कल्पना आणि त्यांच्या मर्यादा तपासल्या आहेत. आधुनिक काळात 'नारी समता मंच' मार्फत स्त्रियांच्या निवारा, आर्थिक आणि सामाजिक-सांस्कृतिक स्तरावरील मागण्या या चळवळीचा पुढचा टप्पा दर्शवतात, ज्यातून लिंगभेदरहित कायदे आणि स्वतंत्र स्त्री-अस्तित्वाची मागणी अधोरेखित होते.

## KEYWORDS:

स्त्रीवादी लेखन, ताराबाई शिंदे, पितृसत्ताक व्यवस्था, स्त्री-पुरुष समानता, नारी समता मंच.

स्त्रीवादी लेखिकांची अभिव्यक्ती स्त्रीकेंद्री अनुभवविश्व, लैंगिक जाणिवा, आणि पितृसत्ताक व्यवस्थेतील स्त्रियांच्या दडपशाहीवर केंद्रित असते. त्यांची सामाजिकता पुरुषप्रधान समाजातील स्त्रीच्या भूमिकेचे विश्लेषण करून, तिला समान हक्क आणि सामाजिक न्याय मिळवून देण्याच्या दिशेने असते. या लेखिका समाजातील रूढी, परंपरा, आणि दुहेरी मानके उघड करून स्त्री-पुरुष संबंधांचे वास्तव मांडतात आणि स्त्रीला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व म्हणून जगण्याचे स्वातंत्र्य मिळावे यासाठी प्रयत्नशील असतात.

स्त्रीवाद ही केवळ एक विचारप्रणाली नाही तर समाजपरिवर्तन घडवून आणण्याचा 'राजकीय' प्रयत्न आहे. स्त्रीवादी जाणिवेचे प्रकटीकरण विविध स्तरांवर, वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून होत आले आहे. उदारमतवादी, मार्क्सवादी, समाजवादी, उत्तर-आधुनिक अशा विचारधारांना आपली ऊर्जा देत, स्त्रीवादी भान स्त्री-पुरुष विषमतेच्या प्रश्नांची चिकित्सा करत राहते. त्यामुळे काळानुरूप स्त्रीवादाची वेगवेगळी रूपे दिसतात; अनेकदा त्यांच्यात परस्परविरोधही दिसून येतो. हीच बहुरंगी छटा स्त्रीवादी साहित्यात प्रतिबिंबित होते. स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाला पुरुषाच्या आधाराशिवायही पूर्णता मिळू शकते, तसेच तिला प्रेमाइतकीच स्वतंत्रपणे माणूस म्हणून जगण्याची ओढ आहे—हे सांगणारे लेखन, तसेच स्त्रीत्वाच्या प्रवासातील विविध अनुभव मांडणारे लेखन हे स्त्रीवादी साहित्य मानले जाते. पुरुषप्रधानतेला धक्का देणारे, स्त्रीला केवळ लिंगाधिष्ठित चौकटीत न पाहता 'माणूस' म्हणून मांडणारे साहित्य हे स्त्रीवादी ठरते. अशा लेखनाचा लेखक पुरुष असला तरी, त्यामागील जाणिवा तत्त्वतः स्त्रीवादी असू शकतात. मात्र स्त्रीने अनुभवलेल्या पुरुषी वर्चस्वामुळे, तिच्या लेखनाला अधिक नेमकेपणा व धार प्राप्त होते, असे मानले जाते.

स्त्रीवाद्यांच्या दृष्टिकोनातून, स्त्रियांच्या लेखनातून उमटणारी प्रतिमा, प्रतीके आणि भाषा ही खरी ओळख निर्माण करण्यासाठी काही काळ तरी जाणीवपूर्वक वेगळेपण जपणे गरजेचे आहे. अशा निराळ्या दृष्टिकोनातूनच स्त्रीवादी साहित्याची खरी ताकद उलगडते. प्रस्तुत शोधनिबंधातून महाराष्ट्रातील एकोणिसाव्या शतकातील व त्यानंतर आजवर स्त्री साहित्यातून उमटलेले नवे विषय, नव्या जाणीव व शोध यांचा विचार केला जाणार आहे.

### उद्देश

1. मराठी साहित्यातील स्त्रीवादी प्रवाहाची ओळख करून देणे.
2. स्त्रीवादी कथा, कादंबरी, आत्मकथन व कविता लिहिणाऱ्या लेखिकांच्या लेखनातील साधर्म्य शोधणे.
3. मराठी साहित्य व त्यातून निर्माण झालेली स्त्रीवादी चळवळ यांचा अनुबंध प्रस्थापित करणे.

**एकोणिसाव्या शतकातील स्त्री साहित्य:**

एकोणिसाव्या शतकातल्या स्त्रीशिक्षणाचा इतिहास म्हणजे स्त्रियांच्या अस्मितेच्या लढ्यामधला एक रोमांचकारी कालखंड आहे. या काळातल्या एकूणच नवशिक्षणाने घडवून आणलेल्या परिवर्तनाची अतिशय विस्तृत आणि गुंतागुंतीची पार्श्वभूमी त्याला आहे.

“आमच्या आयुष्यातील आठवणी” हे आत्मकथन रमाबाई रानडे यांनी लिहिलेले आहे. हे मराठी साहित्यातील स्त्री-आत्मकथनाचे एक महत्त्वाचे प्रारंभिक उदाहरण मानले जाते. या ग्रंथामध्ये त्यांनी स्वतःच्या आयुष्यातील अनुभव, स्त्रीजीवनावरील बंधने, सामाजिक स्थिती, तसेच महादेव गोविंद रानडे यांच्यासोबतचा सहवास आणि त्यांच्या विचारांचा प्रभाव यांचा अत्यंत प्रामाणिक आणि साध्या भाषेत उलगडा केला आहे. हे आत्मकथन केवळ वैयक्तिक आयुष्याचंचित्रण करत नाही, तर उशिरा १९ व्या शतकातील समाजव्यवस्थेचं आणि स्त्रियांच्या स्थितीचं जिवंत दस्तऐवजीकरणही ठरतं.

१८८२ साली ताराबाई शिंदे यांनी लिहिलेलं “स्त्री-पुरुष तुलना” हे मराठीतीलच नव्हे तर भारतीय साहित्यातील पहिलं स्त्रीवादी स्वरूपाचं लेखन मानलं जातं. या ग्रंथात त्यांनी समाजातील स्त्री-पुरुष विषमतेवर थेट प्रहार केला. स्त्रीच्या जीवनातील अन्याय, रूढी-परंपरांनी घालून दिलेल्या मर्यादा आणि पुरुषप्रधानतेमुळे निर्माण झालेली दुय्यम वागणूक यांचा त्यांनी अत्यंत निर्भीडपणे पर्दाफाश केला. हा ग्रंथ केवळ स्त्रीवादी चळवळीचा आरंभ बिंदू नसून पुढील काळातील स्त्रीवादी लेखनासाठी दिशादर्शक ठरला.

स्मृतिचित्रे हे लक्ष्मीबाई टिळक यांचे आत्मचरित्र आहे. केवळ

स्त्रियांच्याच नव्हे तर एकूण मराठी साहित्यात या आत्मचरित्राचे मोलाचे स्थान आहे. परंपरागत रीतिरिवाजात वाढलेल्या लक्ष्मीबाई यांचं लग्न त्यांच्या वयाच्या अकराव्या वर्षी नारायण वामन टिळक यांच्याशी झाले. घरातील रूढी, परंपरा, चालीरीतींचा पगडा लक्ष्मीबाईंवर बालपणापासूनच होता, त्यामुळे त्या जास्त शिक्षण घेऊ शकल्या नाहीत. लग्न झाल्यावर नारायण टिळकांनी त्यांना जमेल त्या वेळेत स्वतः शिक्षण दिले. स्मृतिचित्रे या त्यांच्या गाजलेल्या आत्मचरित्रात त्यांनी या त्यांच्यावर झालेल्या ख्रिश्चन प्रभावाचे वर्णन केले आहे. नारायणराव टिळक हे सदसद्विवेकी बुद्धिवादी आणि चिकित्सक व्यक्तिमत्त्व होते. त्यांचा प्रभाव लक्ष्मीबाई टिळक यांच्यावर लवकरच पडला. स्मृतिचित्रे या आत्मकथनातून लक्ष्मीबाई टिळक यांनी तत्कालिन सामाजिक व्यवस्थेचे चित्रण केले आहे. त्यांचे पती रेव्ह. ना. वा. टिळक व त्या स्वतः ख्रिस्ती कशा झाल्या याचे वर्णन या पुस्तकात त्यांनी केले आहे. त्यांच्या या आत्मचरित्रात, जातिव्यवस्था, धार्मिक द्वेष, विचार-स्वातंत्र्यावर असलेली बंधने यांचे वर्णन आले आहे.

**कादंबरी लेखनातील वेगळेपण:**

कादंबऱ्यांच्या आधारे महाराष्ट्रातील १९०१ ते १९३० स्त्रीची वाटचाल पाहताना प्रथम लक्ष जाते ते ह. ना. आपटे यांच्या “पण लक्षात कोण घेतो!” (१८९३) या कादंबरीच्या रूपाकडे. या कादंबरीची पंधराशे प्रतींची दुसरी आवृत्ती १९०९ मध्ये, दोन हजार प्रतींची तिसरी आवृत्ती १९१५ मध्ये, दोन हजार प्रतींची चौथी आवृत्ती १९२२ मध्ये आणि दोन हजार प्रतींची पाचवी आवृत्ती १९२८ मध्ये निघाली. केशवपनाच्या रूढीतील अमानुषता, स्त्री-शिक्षण, सुटसुटीत कुटुंबाचे रम्य चित्र. दोन-तीन तरुण जोडप्यांचे एकत्र बसून गप्पागोष्टी करणे हे सारे चित्रित करणाऱ्या या कादंबरीचा या काळातील एवढा खप समाजमनातील स्त्री-सुधारणेचा कल स्पष्टपणे दाखवतो. सामाजिक कादंबरी निर्मितीच्या दृष्टीने हरिभाऊंच्या प्रतिभेचा हा उतरता काळ. तरीही या काळातील त्यांच्या पूर्ण, अपूर्ण कादंबऱ्यांमध्ये बदलत्या स्त्री-जीवनाचे चित्र दिसते. या काळात त्यांनी चित्रित केलेल्या स्त्रिया ‘पण लक्षात कोण घेतो’ मधल्या यमू आणि दुर्गी इतक्या अगतिक नाहीत.

‘मी’ (१९१६) कादंबरीतली ताई प्रथम अगतिकतेने म्हणते,

"बाबारे! आम्ही घरात बांधलेली मुकी जनावरं !" पण पुढे अति झाल्यावर ती नवऱ्याला हाकलून देते. विचारी वडील माणसेही आता मुलीकडे केवळ 'लग्नाऊ वस्तू' म्हणून पाहत नाहीत. 'मी' कादंबरीतल्या 'सुधारक' शिवरामपंतांच्या मुलीने खूप शिकून, लग्न न करता समाजकार्य करावे अशी इच्छा. सुंदरीची बुद्धी वडिलांचे विचार समजू शकली तरी तिच्या भावना बाळबोध, संसारी मुलीच्या. शिवरामपंत स्वमत न लादता तिच्या कलानेच जायचे ठरवतात. अपूर्ण राहिलेल्या 'कर्मयोग' कादंबरीतील 'लीला' ही बदलत्या स्त्री-जीवनाचा मनोहारी उन्मेष असल्याचे समीक्षक कुसुमावती देशपांडे सांगतात.

शिक्षणाच्या प्रसारानंतर महाराष्ट्रात पुरुषांच्या समान स्थान इच्छिणारी आणि मूलभूत स्वातंत्र्याची मागणी करणारी स्त्री जन्म घेत होती. तिच्या अस्तित्वाचा अस्सल पुरावा नियतकालिकांच्या निरीक्षणामध्ये मागे दिलाच आहे. ('प्राची प्रभा'मधील साम्यवादिनी बाई आणि 'गृहिणी रत्नमाला' मधील अन्नपूर्णाबाईंचे पत्र) या स्वतंत्र स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाचे सर्व पैलू वा. म. जोशी यांच्या कादंबऱ्यांमध्ये मनोहारी रीतीने व्यक्त झालेले दिसतात. महाराष्ट्रातल्या बदलत्या आधुनिक स्त्री-जीवनाचे पडसाद त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये उमटलेले दिसतात. वा. म. जोशी यांच्या या काळातील चारी कादंबऱ्यांची नावे 'स्त्री' केंद्रबिंदू असल्याची निदर्शक आहेत. 'रागिणी' (१९१५), 'आश्रम हरिणी' (१९१६), 'नलिनी' (१९२०) 'सुशीलेचा देव' (१९३०). यापैकी 'आश्रम हरिणी' ही कादंबरी तेवढी प्राचीन कथेच्या माध्यमातून विधवेच्या पुनर्विवाहाचे समर्थन करण्यासाठी लिहिली आहे. विधवा विवाहाचा प्रश्न ओलांडून समाज स्त्री-सुधारणेच्या बाबतीत अधिक पुढचे विचार करू लागला होता असे बाकीच्या तीन कादंबऱ्या दर्शवितात. वा. म. जोशींची 'उत्तरा' 'स्त्री स्वातंत्र्य' या कल्पनेचा अगदी मूलगामी विचार करते.

**नाटककार आणि स्त्री-सुधारणा:**

१९०१ ते १९३० या काळात मराठी रंगभूमी ऐन बहरात होती. कृ. प्र. खाडिलकर, रा. ग. गडकरी, भा. वि. वरेरकर, वीर वामनराव जोशी हे नाटककार लोकप्रियतेच्या शिखरावर होते. श्री. कृ. कोल्हटकर, वासुदेव शास्त्री खरे, न. चिं. केळकर, यांच्या नाटकांना अफाट लोकप्रियता

लाभली नसली तरी मर्यादित लोकमान्यता होती. यांखेरीज नाट्य समीक्षकांनी ज्यांची दखल केवळ उल्लेखापुरती घेतली किंवा घेतलीच नाही असे अनेक नाटककार या काळात होते. या सर्व नाटकांचे निरीक्षण करताना तत्कालीन समाजाचे जिव्हाळ्याचे विषय लक्षात येतात. राष्ट्र स्वातंत्र्याचा ध्यास त्या समाजास लागला होता. देशभक्ती हा उत्कट रस व्यक्ती-व्यक्तीच्या मनात हेलावत होता. 'स्त्री-जीवन परिवर्तन' विषयक विचारांची सतत घुसळण त्या समाजात सुरू होती. 'स्त्री जीवन' या विषयाला स्वातंत्र्य, देशभक्ती यांच्या बरोबरीचे स्थान नाटककारांनी दिलेले दिसते. स्त्री सुधारणेविषयीची उत्सुकता आणि सुधारणेच्या परिणामांची भीती नाटककारांच्या, समाजाच्या मनात होती. कादंबरीकारांप्रमाणेच मराठी नाटकांनी स्त्री जाणीवांना समृद्ध करणारे साहित्य जन्माला आणले.

स्त्रीभोवतीची नीतीची चौकट घट्ट ठेवून स्त्री-शिक्षण, विधवा विवाहाचा पुरस्कार करणारे आणि बालविवाह, बाला-वृद्ध विवाह याचा निषेध करणारे! 'सुशिक्षित स्त्री'ने पतिव्रता आणि अधिक कर्तव्यदक्ष प्रेमळ माता असण्यावर भर देणारे असे अनेक नाटके या काळात आली आणि त्यांनी मराठी रंगभूमीला समृद्ध केले. या काळातील अनेक नाटकांत स्त्रिया रणांगणात उतरलेल्या दिसतात. त्यांनी रणांगणात उतरावे किंवा नाही याबद्दल चर्चाही नाटकात आहेत. म. गांधींच्या हाकेबरोबर स्त्रिया स्वातंत्र्य लढ्यात उतरल्या होत्या.

रा. ग. गडकरी: 'भावबंधन' (१९१९) २री आवृत्ती. अंक २. प्रवेश १ पृष्ठ ६४,६५. येथे नाटककार गडकरी स्त्री-शिक्षणाची शिफारस करतात. परंतु या संवादातील "बोलण्याचे प्रमाण नेहमी असेच राहणार आहे का" हे वाक्य महत्त्वाचे आहे. शिकलेली असली तरी लतिका काही कायम फटकळपणे बोलणारी राहणार नाही, असा अभिप्राय त्यातून व्यक्त होतो. म्हणजेच ही शिक्षित 'स्त्री' सुद्धा अल्लड वय निघून गेल्यावर पारंपरिक स्त्रीप्रमाणेच खाली मान घालून संयमाने बोलणारीच असेल अशी कल्पना गृहीत धरली आहे. गडकरींच्या 'पुण्यप्रभाव' (१९१७) या नाटकात वसुंधरेच्या पातिव्रत्यामुळे खलनायक वृंदावनाच्या मनात बदल होतो. तिचा हात धरण्यासाठी आलेला वृंदावन तिचे पाय धरतो. स्त्री-सुधारणा आणि पातिव्रत्य या कल्पनांची जी सांगड प्रतिभासंपन्न नामांकित नाटककार गडकरी आणि त्यांच्यासारखी इतर नाटककारांनी

घातली होती तिचेच अनुकरण कृ. ना. अस्नोडकरांसारख्या समीक्षकांनी दखल न घेतलेल्या सामान्य नाटककाराने केले होते. त्यांच्या नाटकातील तरुण मुली दोन विवाहेच्छू म्हाताऱ्यांना म्हणजे स्वतःच्या वडिलांनाच फसवाफसवीने बुरखे घालून विवाहासाठी समोरासमोर उभे करतात आणि उपहासाची मंगलाष्टके म्हणतात. "इतक्या धीट, बंडखोर, सुशिक्षित मुली स्वतःचे शील, शरीर पावीत्र्य कमालीचे जपतात." स्त्री-सुधारणेच्या बाबतीत कादंबरीकारांच्या विचारांना ज्या मर्यादा होत्या त्याच मर्यादा नाटककारांच्या विचारांनाही होत्या.

**साठोत्तरी कालखंड:**

स्त्रीसुधारणेचा प्रश्न व्यापक अर्थाने अनेक सामाजिक सुधारणांशी निगडित होता. याबाबत सांगताना लेखिका अरुणा ढेरे आपल्या विस्मृती चित्रे या पुस्तकात लिहितात. "सतीबंदी, बालविवाहाला आणि जरठ-कुमारी-विवाहाला विरोध, विधवा विवाहाला उत्तेजन, केशवपन बंदी, संमति वयाचा आग्रह अशा चळवळींना प्रारंभ झाला होता. प्रत्येक बाब संवेदनशील होती आणि ही गोष्ट लक्षात घेऊन प्रयत्नांची आखणी करणाऱ्या सुधारकांमध्ये मतभिन्नता होती. या मतभिन्नतेचे परिणाम एकीकडे विविध संस्थांना आणि सार्वजनिक उपक्रमांना जन्म देण्यात होत होते आणि दुसरीकडे सर्वसामान्य माणसाच्या संभ्रमात भर घालण्यात, मिशनऱ्यांचा हेतू काही अंशी सफल करण्यात आणि सनातन्यांचे बळ वाढवण्यात होत होते. तरीही काळाचा कौल विधायक प्रयत्न यशस्वी करण्याचाच होता आणि चित्र हळूहळू आशादायक रीतीने पालटत होते. या पालटाला सर्वात जास्त हातभार लावला तो स्त्रीशिक्षणाने."

एकोणिसाव्या शतकातल्या स्त्रीशिक्षणाचा इतिहास म्हणजे स्त्रियांच्या अस्मितेच्या लढ्यामधला एक रोमांचकारी कालखंड आहे. या काळातल्या एकूणच नवशिक्षणाने घडवून आणलेल्या परिवर्तनाची अतिशय विस्तृत आणि गुंतागुंतीची पार्श्वभूमी त्याला आहे.

साठोत्तरी कालखंडात, १९७०—८० च्या दशकांत व नंतरच्या काळातही काव्यनिर्मिती करणाऱ्या अनेक कवयित्रींनी स्त्रीवादी काव्याचे दालन समृद्ध केले आहे. त्यांतील काही प्रमुख कवयित्री अशा : अनुराधा पाटील, रजनी परुळेकर, मलिका अमर शेख, प्रभा गणोरकर, अरुणा ढेरे,

नीरजा, प्रज्ञा लोखंडे, कविता महाजन, आसावरी काकडे, सिसिलिया कार्व्हालो इत्यादी. स्त्रीत्वाचे, स्त्रीवादी जाणिवेचे, स्त्रीच्या विशिष्ट अनुभव-विश्वाचे वेगवेगळ्या पातळ्यांवरचे, भिन्न भिन्न स्वरूपाचे चित्रण त्यांच्या कवितांत आढळते. व्यक्तिनिष्ठ तसेच सामाजिक-सांस्कृतिक वास्तवाचे थेट चित्रण करणाऱ्या या कविता स्त्रीत्वाचा आत्मभानयुक्त स्वर आळवणाऱ्या आहेत. बाईचे सामर्थ्य व अनेकविध क्षमतांच्या शक्यता सूचित करणाऱ्या भविष्यवेधी कविता काही कवयित्रींनी लिहिल्या आहेत. बाईतील अपार करुणा, तिची सर्जनशीलता, नवनिर्मितीची क्षमता ही तिची बलस्थाने अनेक कवितांतून व्यक्त झाली आहेत. १९८०—९० च्या दशकांत स्त्रीवादी जाणिवेच्या काव्याचा प्रवाह लक्षणीय होता. स्त्रीकेंद्री काव्यलेखनाचे प्रमाण उत्तरोत्तर वाढतच गेले.

**आधुनिक काळातील स्त्री चळवळ:**

गेल्या पन्नास वर्षात आपल्या भारतीय विशेषतः महाराष्ट्रात स्त्रीच्या एकटेपणाचे काही संदर्भ आहेत. म्हणूनच एकटेपण अंगावर कोसळलं म्हणून ज्यांनी ते निभावलं, वाट्याला आलेल्या एकटेपणाला ज्या सामोऱ्या गेल्या आणि एकटेपणाचं ज्यांनी विचारपूर्वक स्वागत केलं त्या साऱ्या जणींना बोलकं करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रात 'नारी समता मंच' हे एक हक्काचे व्यासपीठ स्त्रियांना मिळाले. या योगे स्त्री चळवळ अत्यंत जवळून समजून घेता येते. स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलल्याशिवाय त्यांच्यासाठीच्या योजनांबाबत धोरण आणि अंमलबजावणी यात बदल होणार नाही आणि कायद्यामधील पुरुष सापेक्षताही जाणार नाही. सध्या विवाह, घटस्फोट, पोटगी इत्यादी गोष्टी धर्माप्रमाणे ठरतात आणि सर्व धर्माधिष्ठित कायदे स्त्रियांना दुय्यम स्थान देतात. हे कायदे लिंगभेदरहित होणे आवश्यक आहे. या संदर्भात तीन स्तरांवर काही मागण्या या नारी समता मंचातर्फे करण्यात आल्या.

**निवारा:**

1. घर - सहकारी - सरकारी योजनेत एकट्या स्त्रियांसाठी काही हिस्सा ठरवून दिला जावा.
2. सर्व तालुका पातळीवर आधारगृहे उभारण्याची तातडीची योजना

हवी. या आधारगृहात स्त्रियांनी मुलांसह राहता यावे.

3. कमी उत्पन्नाच्या मिळवत्या स्त्रियांसाठी किमान सुविधा पुरविणारी पण प्रौढ स्त्रीला जबाबदार माणूस म्हणून मान्यता देणारी वसतिगृहे बांधावीत.
4. विवाहानंतर राहत्या घरात नवऱ्या बरोबरीचा हक्क त्याच्या बायकोला मिळाला पाहिजे.
5. विवाहानंतर सासर सोडून माहेरी परताव लागलेल्या स्त्रीला तिच्या माहेरच्या घरात कायदेशीर निवारा मिळाला पाहिजे.
6. घरासाठी कमी व्याजाच्या किंवा बिनव्याजी कर्जाची सोय.

**आर्थिक स्तर:**

1. हुंडाबंदीचा कायदा असूनही हुंडा किंवा लग्नखर्च हा मुलीच्या संदर्भात तिच्या माहेरच्या संपत्तीत ला वाटा मानला जातो. याऐवजी मुलीला मुलाच्या बरोबरीने आई-वडिलांच्या घरात संपत्तीत वाटा मिळावा. जमिनीतही नावावर वाटा मिळावा.
2. विवाहानंतरची घर व घरातील कमाई नवरा-बायकोच्या समान मालकीची असावी.
3. पोटगी ही मेहेरबानी नसून हक्क आहे. म्हणून ती लवकर मिळावी, सातत्याने मिळावी यासाठीच्या तरतुदी केल्या जाव्यात. उदा. नोकरदार नवऱ्याकडूनची पोटगी पगारातून कापून दिली जावी.
4. कामाच्या जागी स्त्रियांच्या संख्येशी पाळणाघरांचा संबंध तोडू नये. कामाच्या जागी स्त्रिया असल्या किंवा नसल्या तरी पाळणाघर असावे. पालकत्वाच्या जबाबदारीत वडिलांचा सहभाग या धोरणाच्या दिशेने हे एक पाऊल असेल.
5. स्त्रीच्या गृहव्यवस्थापनाच्या कामाचं मूल्यमापन सरकारी पातळीवर रुजू व्हावं.
6. स्त्रियांच्या सहकारी संस्थांना आणि उद्योगांना राखीव बाजारपेठ हवी.

**सामाजिक / सांस्कृतिक:**

1. स्त्रीचं स्थान तिच्या वैवाहिक दर्जाशी जोडून ठरवलं जाऊ नये. तिचं स्थान पुरुषाप्रमाणे तिच्या स्वतःच्या कर्तृत्वावर मोजलं जावं.
2. विधवा, परित्यक्ता, घटस्फोटिता, अविवाहिता या भेदावर आधारित सांस्कृतिक / धार्मिक समारंभात स्त्रीची उच्चनीचता व लायकी ठरवली जाता कामा नये.
3. कुटुंब आणि रक्ताची नाती या पलीकडच्या मानवी संबंधाकडे खुल्या नजरेने बघून त्यांचा स्वीकार व्हावा.
4. कुटुंब म्हणजे भावनिक आधार देणारी आणि सर्वांच्या विश्वासाला वाव देणारी रचना. ती विवाहावर आधारित अशीच असावी हा आग्रह सोडला पाहिजे.
5. एकट्या स्त्रीला मैत्रीची दारं बंद नसावीत. तिला बावळट, कुरूप, अविकसित ठेवण्याचा, तिला असुरक्षिततेची भावना देण्याचा समाजाचा डाव उधळून लावला पाहिजे.
6. स्वतंत्रपणे एकटीनं राहाणं हे दमनकारी समाजव्यवस्थेत कठीण आहे. तेव्हा अशा जीवनाचा खडतर अनुभव आणि होणाऱ्या चुका यांचा संबंध पुरुषाच्या गैरहजेरीशी जोडण्याची गरज नाही.
7. सरकारी / खाजगी कार्यालयात स्त्रीचं नाव ती लिहील त्या पद्धतीने मान्य व्हावं.

**Funding:**

This study was not funded by any grant.

**Conflict of interest:**

The Authors have no conflict of interest to declare that they are relevant to the content of this article.

**About the License:**

© The Authors 2024. The text of this article is open access and licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.